9291५

# परिपत्रक

क्र. सीएसई 1096/एआरएम(96-97)/एक(म)

विषय:- मुल्याधारीत अबकारी कर पध्दती
मुंबई 30 ऑक्टोबर 1996

दिनांक 1 जानेवारी 1997 पासून मद्यावरील मुल्याधारीत अबकारी कर आकारणी संबधी शासनाने 13 सप्टेंबर 1996 रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आहे. ही करपध्दती अंमलात आणण्यासाठी आवश्यक नियमांचे मसुदेही शासनाने त्याच दिवशी प्रसिध्द केलेले असून त्यावर आलेले आक्षेप आणि सूचना विचारातघेऊन महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र क्रमांक 229 भाग चार-ब दिनांक 18.10.1996 अन्वये अंतिमरित्या नियम प्रसिध्द केले आहेत (प्रत सोबत जोडलेली आहे). या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांना पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

1) निमिर्ती मूल्य/किरकोळ विक्रीची कमाल किंमत

(अ) राज्य उत्पादन शुल्क अधिका-याचे लक्ष या संदर्भात शासनाने मुंबई दारुबंदी कायदा, 1949 च्या कलम 105 खालील स्पष्टीकरणात केलेल्या बदलाकडे वेधण्यात येत असून असे स्पष्ट करण्यात येते की या बदलाप्रमाणे मद्य निर्मितीमूल्यावर आधारीत अबकारी कर आकारण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. तदनुसार संबंधीत नियमात बदल करण्यात आलेले असून निर्मात्यांनी किंवा परराज्यातून या राज्यात निर्यात करणा-यांनी 'महाराष्ट्रात विक्रीसाठी असलेल्या' मद्याचे निर्मिती मूल्य व किरकोळ विक्रीची कमाल किंमत जाहीर करावयाची आहे. विक्रीसाठी तयार करण्यात आलेल्या मद्याच्या बाटल्यावरील लेबलांवर किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापायचे बंधन घालण्यात आलेले आहे. या राज्यातील निर्मात्यानी निर्मितीमूल्य व किरकोळ विक्रीची कमाल किंमत अधीक्षकांकडे जाहीर करायची असून ती नियमाप्रमाणे असल्यास अधीक्षकांनी प्रमाणित करायचे आहे. परराज्यातून या राज्यात येणा-या मद्याचे निर्मितीमूल्य व किरकोळ विक्रीची कमाल किंमत त्या राज्यातील निर्यातदार आयुक्तांकडे जाहीर करतील व आयुक्त ती प्रमाणित करुन देतील.

(ब) निर्मितीमूल्य व किरकोळ विक्रीची कमाल किंमत कोणत्या नमुन्यात जाहीर करावयाची या विषयीचा नमुना या परिपत्रकास जोडण्यात आला आहे. या नमुन्यात निर्मितीमूल्य आणि त्या सोबत किरकोळ विक्रीची कमाल किंमत दर्शविण्याची तरतूद केलेली आहे. निर्मात्यांनी निर्मितीमूल्य कशाप्रकारे निश्चित केले आहे हे पहाण्याची जबाबदारी अधीक्षक किंवा कोणत्याही राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांची नाही. परंतू जाहीर केलेल्या निर्मितीमूल्यानुसार जाहीर केलेली किरकोळविक्रीची कमाल किंमत नियमाप्रमाणे विहीत प्रमाणात आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी निर्मितीमूल्य प्रमाणित करणा-या अधिका-यांची राहील. जाहीर केलेल्या निर्मितीमूल्यावरुन किरकोळ विक्रीची कमाल किंमत जास्तीत जास्त किती असू शकेल यावर कायद्याचे बंधन आहे (महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत निर्धारण) नियम 1996 अनुसार) जर निर्मात्यांनी अनुज्ञेय किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीपेक्षा जास्त किरकोळ विक्रिची कमाल किंमत दर्शविली असेल तर अधिक्षकांनी ती प्रमाणीत करू नये.

(क) अधीक्षकांनी किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीवरुन निर्मितीमूल्य ठरवू नये. त्याचप्रमाणे निर्मात्याने विक्रीच्यावेळी दिलेल्या बिलात नमूद केलेली किंमत जाहीर केलेल्या निर्मिती मुल्यापेक्षा वेगळी असू शकेल. बिलाच्या रकमेत निर्मितीमूल्य राज्य उत्पादन शुल्क व निर्मात्यांचा नफा समाविष्ट असतो. म्हणून बिलाची रक्कम जाहीर केलेले निर्मितीमूल्य व राज्य उत्पादन शुल्क यांच्या बेरजेपेक्षा थोडीफार कमी जास्त असू शकेल. मात्र बिलाची रक्कम (उत्पादन शुल्कासह ) किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीपेक्षा ठोक व किरकोळ विक्रत्यांना होणारा नफा लक्षात घेता, त्याप्रमाणात कमी असावयास हवी.

[ड] निर्मितीमूल्य / किरकोळ विक्रीची कमाल किंमत ब्रँड व पॅकप्रमाणे वेगवेगळी असू शकेल. परंतु अनुज्ञेय कमाल किंमतीपेक्षा ती जास्त असणार नाही हे पहाण्यात यावे.

[इ] किरकोळ विक्रीची कमाल किंमत अधिक्षकांनी [ जिल्ह्यातील निर्माणीसाठी ] किंवा आयुक्तांनी [ आयात मद्यासाठी] प्रमाणीत केल्यानंतर कोणत्याही मद्याच्या बाटलीवर त्यापेक्षा जास्त किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापली जाणार नाही , याची काळजी घेण्याची जबाबदारी या राज्यात निर्मित मद्यासाठी निर्माणी प्रभारी अधिकाऱ्यांची व अधिक्षकांची राहील. प्रमाणीत किरकोळ विक्रिच्या कमाल किंमतीपेक्षा जास्त किंमत छापलेले मद्य आयात होणार नाही किंवा निर्माणीकडून एफएल-1 अनुज्ञप्तीकडे घेणार नाही, हे पहाण्याची जबाबदारी एफएल-1 वरील प्रभारी अधिकाऱ्यांची व अधिक्षकांची राहील [परिच्छेद क. 2 पहा. ] तसेच सीएल-1 अनुज्ञप्तीकडून सीएल-2 अनुज्ञप्तीकडे जाणा-या मद्याच्या बाटलीवर किरकोळ विक्रिची कमाल किंमत प्रमाणीत किंमतीपेक्षा जास्त छापलेली नसेल हे पहाण्याची जबाबदारी सीएल-1 वरील प्रभारी अधिका-याची व अधिक्षकाची राहील. प्रमाणीत निर्मिती मूल्यानुसार उत्पादन शुल्क वसुलीची जबाबदारी निर्माणीवरील प्रभारी अधिका-याची व आयात मद्याबाबत अधिक्षक व एफएल-1 वरील प्रभारी अधिका-याची राहील.

[ई] किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीत सर्व प्रकारचे कर , शुल्क , स्थानीक कर इ. चा समावेश आहे. बाटलीवर छापलेल्या किंमतापेक्षा कोठेही [ शहरी अथवा ग्रामीण भागात ] जास्त किंमतीत मद्य विकले जाणार नाही याची दक्षता कार्यकारी राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांनी घ्यावयाची आहे. असे आढळून आल्यास सदर बाब नियम आणि अनुज्ञप्तीच्या अटी यांचा भंग समजून अनुज्ञप्तीधारकाविरूध्द कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी. यांत फौजदारी कारवाईचाही समावेश आहे.

## [२] निर्मितीमूल्य आणि किरकोळ विक्रीच्या कमाल किमतीच्या मान्यताप्राप्त प्रमाणपत्रांचे वितरण.

[अ] निर्मितीमूल्य व किरकोळ विक्रीची कमाल किमत अधिक्षकांनी प्रमाणीत केल्यानंतर अशा प्रमाणपत्रांच्या मूळप्रतीपैकी एक प्रत अधिक्षक स्वत:च्या मूळ सहीनिशी आयुक्तांना तसेच छायांकित परंतु स्वतःच्या सही, शिक्क्यानिशी प्रमाणीत प्रती इतर सर्व अधिक्षक व आपल्या जिल्ह्यातील सर्व कार्यकारी/अकार्यकारी अधिकारी यांना पाठवतील अशा प्रमाणपत्रांची एक प्रत उप संचालक, संगणक विभाग, आयुक्त कार्यालय यांच्याकडे नावाने पाठवावी. पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात येते की आपल्या जिल्ह्यातील इतर अधिका-यांना किंवा इतर अधिक्षकांना पाठवावयाच्या प्रतीवर स्वतः सही करणे अनिवार्य आहे. सही केलेल्या प्रतीची छायांकित प्रत पाठवू नये.

[ब] निर्मितीमूल्य व किरकोळ विक्रीची कमाल किंमत आयुक्तांनी प्रमाणीत केल्यानंतर अशा प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती आयुक्त स्वतःच्या मूळ सहीनिशी सर्व अधिक्षकांना पाठवतील.

[क] आयुक्तांकडून / इतर अधिक्षकांकडून प्राप्त झालेल्या निर्मितीमुल्य / किरकोळ विक्रीच्या कमाल किमतीच्या प्रमाणीत छायांकीत प्रती अधिक्षक त्यांच्या जिल्ह्यातील सर्व कार्यकारी / अकार्यकारी अधिका-यांना त्यांच्या मूळ सहीने प्रमाणित करून पाठवतील [अधिक्षकांनी प्रत्येक प्रतीवर सही करावी.]

## [३] उत्पादनशुल्क कमी भरण्याच्या हेतूने निर्मितीमूल्य कमी दाखवणे:

शक्यता आहे की, काही विदेशी मद्याच्या विशेषतः बिअर व वाइनच्या बाबतीत उत्पादक कमी निर्मितीमूल्य दाखवून सध्याच्या किरकोळ विक्री बाजारभावापेक्षा किरकोळ विक्रीची कमाल किंमत कमी दाखविण्याचा प्रयत्न करतील. असा प्रकार निदर्शनास आल्यास निर्मितीमूल्य / किरकोळ विक्रीची कमाल किंमत प्रमाणीत करण्यापूर्वी आयुक्तांशी फॅक्स / दूरध्वनीवरून तात्काळ संपर्क साधावा.

## [४] किरकोळ विक्रीची कमाल किंमत दर्शविलेल्या मद्यसाठ्यासंबंधी

[अ] मूल्याधारीत अबकारी कर पध्दती 1 जानेवारी 1997 पासून अंमलात येत आहे. यानुसार किरकोळ विक्री कमाल किंमत न छापलेले मद्य दि. 31-12-96 नंतर महाराष्ट्रात विक्रीसाठी निर्मीत करता येणार नाही किंवा त्याची इतर राज्यातून आयातही करता येणार नाही. असे असले तरीही काही ठोक आणि किरकोळ विक्रेत्यांकडे 31-12-96 अखेर काही कमाल विक्री किंमत न छापलेला मद्यसाठा असणे सहाजिक आहे, हे लक्षात घेता असे ठरविण्यात आले आहे की 31-12-96 अगोदर निर्मीतीमूल्य / किरकोळ विक्रीची कमाल किंमत जाहीर न करता उत्पादीत झालेले व ठोक विक्रेत्यांकडे 31-12-1996 आधी पोहचलेले मद्य ठोक विक्रेते 31 जानेवारी 97 पर्यंत तर किरकोळ विक्रेते 15 फेब्रुवारी 1997 पर्यंत विकू शकतात. राज्य उत्पादनशुल्क अधिका-यांनी 31 जानेवरी 1997 रोजी सायंकाळी ठोक विक्रेत्यांकडील व 15 फेब्रुवारी 1997 रोजी सायंकाळी किरकोळ विक्रेत्यांकडील शिल्लक असलेला मद्यसाठा पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घ्यावा.

[ब] किरकोळ विक्रीची कमाल किंमत न छापलेली लेबल्स लावलेला मद्य साठा निर्माणीतून [ सीएल - 1, पीएलएल, बीआरएल ] सीएल-2 किंवा एफएल-1 अनुज्ञप्तीकडे वाहतुक होताना देण्यात येणाऱ्या वाहतूक परवान्याची मुदत नियमाप्रमाणे परंतु 30.12.1996 पर्यंतच असावी; तसेच ठोक विक्रेत्यांकडून ( सीएल-2 एफएल-1 ) किरकोळ विक्री अनुज्ञप्तीधारकाकडे मद्याच्या होणाऱ्या वाहतुकीसाठी देण्यात येणाऱ्या परवान्याची मुदत 31.1.97 पर्यन्तच राहील. सीएल-2 अनुज्ञप्तीधारकाकडून सीएल्-3 कडे जाणाऱ्या मद्याच्या वाहतुक परवान्याची मुदत 31.1.1997 पर्यन्तच असेल याची जबाबदारी सीएल-2 अनुज्ञप्तीधारकां वर राहील. 1 जाने.1997 पूर्वी किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापलेल्या मान्यताप्राप्त लेबलचा वापर करुन मद्यनिर्मीती करता येईल; परंतु अशा मद्य साठ्यावर निर्मीती महिना जाने.1997 छापणे आवश्यक राहील. असा मद्यसाठा 1 जाने.1997 पासूनच निर्माणीतून निर्गमित करता येईल, त्या आधी निर्गमीत करता येणार नाही.

[क] किरकोळ विक्रीची कमाल किंमत न छापलेली लेबल्स लावलेल्या मद्य साठ्याचे हिशोब निर्माणीतील ( सीएल-1, पीएलएल, बीआरएल) सध्या वापरात असलेल्या नोंदवह्यात 31 डीसेंबर 1996 पर्यन्त ठेवण्यात यावेत. ठोक विक्रेते अशा साठ्याचे हिशोब सध्या वापरात असलेल्या नोंदवह्यात 31 जानेवारी 1997 पर्यंत ठेवतील. किरकोळ विक्रेते हेच हिशोब 15 फेब्रु.1997 पर्यन्त ठेवतील. याप्रमाणे विहित तारखेस संबंधित अनुज्ञप्तीधारकांचे कमाल किंमत न छापलेल्या साठ्याचे हिशोब पूर्ण करून घेवून ते प्रभारी अधिकाऱ्यांनी प्रमाणीत करावेत. सी.एल.2 किंवा किरकोळ विक्रेत्यांचे हिशोब 31 जानेवारी 97/ 15 फेब्रुवारी 97 रोजी त्या विभागाच्या राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी किंवा अधिक्षकांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी अनुज्ञप्तीधारकाकडून पूर्ण करून घेवून स्वतः प्रमाणित करावेत.

[ड] निर्माणी ( सीएल-1, पीएलएल, बीआरएल) अनुज्ञप्तीधारकांनी 1 जाने.1997 पासून किंवा तत्पूर्वी किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापलेली लेबल्स लावलेल्या मद्याचे उत्पादन सुरु केल्यास त्यासाठी लागणाऱ्या मद्यार्काचे व उत्पादीत मद्याचे हिशोब नवीन नोंदवहीत स्वतंत्ररित्या ठेवावेत. त्या नोंदवह्या पुढेही सुरु रहातील. ठोक/ किरकोळ विक्रेते प्रमाणीत किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीची लेबल्स असलेल्या मद्याच्या आवक व विक्रीचे हिशोब नवीन नोंदवहीत 1 जाने.1997 पासुन ठेवतील.

[इ] सर्व पेय मद्य निर्माते ( पीएल, सी.एल.1, बी.आर.एल) ज्या दिवसापासून किरकोळ कमाल किंमत छापलेली मद्यनिर्मीती करतील त्या दिवसापासून किंमत छापलेला व न छापलेला मद्यसाठा बंधित वखारीत वेगवेगळा ठेवतील; याची दक्षता प्रभारी अधिकाऱ्यांनी घ्यावयाची आहे. तसेच ठोक विक्रेते ( एफ.एल.1, सी.एल.2 ) आणि किरकोळ विक्रेत्यांनी किंमत न छापलेला मद्यसाठा व किंमत छापलेला मद्यसाठा वेगवेगळा ठेवला आहे, हे पहाण्याची जबाबदारी एफ.एल.1 वरील प्रभारी अधिकारी आणि इतरत्र त्या विभागाच्या कार्यकारी अधिकाऱ्याची राहील.

92515

[5] निर्माणीतून/ ठोक विक्रेत्यांकडून मद्य साठ्याची विक्री :

निर्माणीतुन ठोक विक्रेत्यांना व ठोक विक्रेत्यांकडून किरकोळ विक्रेत्यांना मद्यसाठा विकतांना प्रत्येक वाहतूक परवान्यावर प्रत्येक ब्रँडचे नाव, आकार, परिमाण, किरकोळ विक्रीची कमाल किंमत, निर्मीतीचा महीना आणि बॅच क्रमांक वेगवेगळी टाकण्यांत यावेत. अधिक्षकांनी या सर्वांची वेळोवेळी तपासणी करावी.

[6] निर्माणीवरील प्रभारी अधिकाऱ्याने पुढील नमुन्यामध्ये प्रत्येक महिन्याच्या शेवटी गोषवारा काढावा.

| ब्रँडचे नाव/ | साईज [मि. ली.] | निर्मीतीमूल्य | किरकोळ विक्रीची कमाल किंमत | आरंभीची शिल्लक |
|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. |

| उत्पादित मद्याचे परिमाण ब. ली. | उत्पादित मद्याचे त्या महीन्यात निर्मीत केलेले परिमाण ब. ली. | वसूल झालेले उत्पादन शुल्क |
|---|---|---|
| 6. | 7. | 8. |

[7] निर्मीतीमूल्य / किरकोळ विक्रीची कमाल किंमत यांतील बदल :

निर्मितीमूल्य आणि तदनुषंगाने किरकोळ विक्रीची कमाल किंमत यांत बदल झाल्यास निर्माणीने किंवा परराज्यातून निर्यात करणाऱ्याने असा झालेला बदल दोन आठवडे आधी जाहीर करणे आवश्यक आहे. त्यांची अंमलबजावणी त्यानंतर येणाऱ्या महीन्याच्या पहिल्या तारखेपासूनच करण्यात येईल. ज्या महिन्यात नवीन निर्मीती मूल्य/ किरकोळ विक्रीची कमाल किंमत जाहीर करण्यात येईल त्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी आगोदर प्रमाणीत केलेल्या निर्मितीमूल्याप्रमाणे करावयाची मद्य निर्मीती संपुष्टात येईल. जुन्या किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीप्रमाणे छापलेले परंतू न वापरलेले लेबल्स प्रभारी अधिकाऱ्याच्या उपस्थीतीत जाळून नष्ट करण्यात यावेत. प्रभारी अधिकाऱ्याने तसे प्रमाणपत्र सात दिवसात अधिक्षकाकडे देणे आवश्यक आहे. जुन्या लेबल्सप्रमाणे निर्माणीत शिल्लक असलेला मद्याचा साठा निर्माणीने विनंती केल्यास नव्याने प्रमाणीत निर्मीती मूल्याप्रमाणे जाहीर केलेल्या किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीप्रमाणे छापलेले लेबल्स वापरुन पुन्हा लेबलींग करता येईल.

## [8] किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापलेल्या मद्याची राज्याबाहेरुन आयात

[अ] आयातीसाठी करावयाच्या अर्जासोबत निर्मीतीमुल्य व किरकोळ विक्रीची कमाल किंमत प्रमाणीत केल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत असणे आवश्यक आहे.

[ब] आयात परवान्यानुसार प्राप्त झालेल्या मद्याचे परिमाण प्राप्त होणाऱ्या निर्यात परवान्यावरील वेगवेगळ्या बॅचप्रमाणे असल्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. आयात परवान्यासाठी केलेल्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे निर्मीतीमूल्य व किरकोळ विक्रीची कमाल किंमत मान्यताप्राप्तप्रमाणपत्रानुसार असल्याची खात्री करणेही आवश्यक आहे. ही जबाबदारी एफएल-1 वरील प्रभारी अधिकाऱ्याची व अधिक्षकांची राहील.

[क] निर्माते किंवा आयात करणारे प्रथम जे निर्मीतीमूल्य व किरकोळ विक्रीची कमाल किंमत जाहीर करतील त्यात पुढे काही कालाने बदल करु शकतात, त्यानंतर पुन्हा जेव्हा जेव्हा बदल जाहीर करतील त्या त्या वेळेस त्यांच्याकडे पूर्वीच्या किरकोळ विक्रीच्या कमाल किंमती छापलेली लेबल्सचा मद्यसाठा शिल्लक असण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवीन आयात परवाना दिल्यानंतर प्रत्यक्षात ते कोणती किरकोळ विक्री कमाल किंमत छापलेला मद्यसाठा आयातीत याचा अंदाज करता येणे शक्य नाही. म्हणून आयातीसाठी परवाना देताना परवाना देण्याच्या तारखेपर्यन्त आयात करावयाच्या मद्याचे जे जास्तीत जास्त निर्मितीमूल्य प्रमाणीत असेल त्याप्रमाणे उत्पादन शुल्क वसुल करण्यात यावे. प्रत्यक्ष आयातीनंतर कमी निर्मितीमूल्य असलेले मद्य प्राप्त झाल्याचे आढळल्यास अनुज्ञप्तीधारकाने उत्पादन शुल्कातील फरकाचा परतावा मागितल्यास त्याची छाननी करुन परतावा देण्यात यावा. कमी निर्मितीमुल्य असलेले मद्य आल्याबाबतची छाननी करण्याची जबाबदारी एफएल-1 वरील प्रभारी अधिकाऱ्याची राहील.

## [9] 31 डिसेंबर 1996 रोजी शिल्लक असलेला परंतु किरकोळ विक्रीची कमाल किंमत न छापलेला मद्यसाठा.

दिनांक 31.12.1996 रोजी प्रत्येक निर्माणीकडील किरकोळ विक्रीची कमाल किंमत न छापलेली लेबल्स लावलेल्या मद्यसाठ्याची गणती करण्यात यावी आणि त्या दिवशी सायंकाळीच हिशोब पूर्ण करुन त्यावर संबंधीत अधिकाऱ्याची सही असावी. अशा विदेशी मद्याच्या (spirit) व वाईनच्या साठ्यावर नवीन मुल्याधारीत अबकारी कर पध्दतीप्रमाणे प्रमाणित किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापलेली लेबल्स लावता येतील. याच लेबल्सवर निर्मिती महिना जानेवारी 1997 टाकण्यात यावा. बीयरची आयुर्मर्यादा सीमित असल्यामुळे फक्त नोव्हेंबर 1996 किंवा डिसेंबर 1996 मध्ये निर्मित बिअरचे पुर्नलेबलींग करता येईल. त्यावर जानेवारी 1997 हा निर्मिती महिना टाकावा. मात्र असा बिअरसाठा प्रथम विकणे आवश्यक आहे.. नोव्हेंबर 1996 पूर्वी निर्मित बिअरसाठी विनंती केल्यास पुर्नः प्रक्रीयेची परवानगी देण्यात येईल.

## [10] किरकोळ विक्रीची कमाल किंमत नसलेल्या मद्याचे आयात परवाने.

ज्यावर किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापलेली नाही असे लेबल्स लावलेल्या मद्याच्या परराज्यातून या राज्यात होणाऱ्या आयातीसाठी द्यावयाचे आयात परवाने जिल्हाधिकाऱ्यांनी/अधिक्षकांनी फक्त 25.12.1996 पर्यंतच्या मुदतीआधीच द्यावेत. त्यापेक्षा जास्त मुदतीचे आयात परवाने देऊ नयेत.

92615



नवीन कर वसूली पध्दतीप्रमाणे किरकोळ विक्रीची कमाल किंमत असलेल्या मद्याची आयात करण्यासाठी डिसेंबर 1996 मध्ये आयात परवाने देण्यास हरकत नाही. परंतु अशा परवान्यांची वैधता 1 जानेवारी 1997 पासून किंवा तद्नंतर सुरू होईल. अशा वेळी 1 जानेवारी 1997 पूर्वी आयात परवाने देताना निर्यातीचा संभाव्य दिवस आयात अर्जावर स्पष्ट लिहून घेण्यात यावा. तो दिवस व तद्नंतर प्रत्यक्ष वाहतूकीस स्थायी आदेशाप्रमाणे लागणारी विहित मुदत लक्षात घेऊन आयात परवान्यावर परवान्याची वैधता कोणत्या तारखेस सुरू होईल व कोणत्या तारखेस संपेल हे स्पष्टपणे लिहीण्यात यावे.

[11] <u>अनुज्ञप्तीधारकांकडून होणारी किरकोळ मद्य विक्री</u>

[अ] सीएल-3 अनुज्ञप्तीधारक दुकानात पिण्यासाठी मद्य विकू शकतात, तसेच सिलबंद बाटल्यांची सुध्दा विक्री करू शकतात. सीलबंद बाटल्यांतून होणारी मद्य विक्री 1 जानेवारी 1997 पासून लेबल्सवर छापलेल्या किंमतीप्रमाणेच होईल याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

[ब] देशी/ विदेशी कोणत्याही किरकोळ विक्री अनुज्ञप्तीधारकाकडून सीलबंद बाटल्यांतून होणारी मद्य विक्री 1 जानेवारी 1997 पासून लेबल्सवर छापलेल्या किंमतीप्रमाणेच झाली पाहीजे.

[12] <u>छापील किरकोळ विक्रीची कमाल किंमत असलेला किरकोळ विक्रेत्यांकडील साठा.</u>

निर्माते व इतर राज्यातून या राज्यात निर्यात करणारे मद्याच्या किरकोळ विक्रीच्या कमाल किंमतीत बदल करण्याचा संभव असल्याने एकाचवेळी किरकोळ विक्रेत्यांकडे एकाच ब्रँडच्या व साइजच्या वेगवेगळ्या किंमती छापलेला मद्यसाठा असू शकेल. किंमतीत केव्हाही वाढ झाली तरीही किरकोळ विक्रेत्यांकडे असलेला मद्यसाठा त्यावर छापलेल्या किंमतीच्या आतच विकला पाहीजे. कोणत्याही परिस्थितीत लेबल्सवरील किंमतीपेक्षा जास्त किंमत घेता येणार नाही. कोणीही जास्त किंमत घेताना आढळल्यास किंवा किंमतीत खाडाखोड बदल किंवा त्यावर स्टिकर लावून जादा किंमत घेण्याचा प्रयत्न केल्यास त्याची अनुज्ञप्ती रद्द करून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

सुबोध कुमार

(सुबोध कुमार)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

सहपत्रे= 2

प्रती :
1) सर्व जिल्हाधिकारी सस्नेह
2) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
3) सर्व अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क,

अधीक्षकांनी वरील सूचना त्यांच्या हाताखालील सर्व अधिकाऱ्यांच्या नजरेस आणून पूर्तता अहवाल विनाविलंब सादर करावा.

सर्व विभागीय उप आयुक्त व अधीक्षकांनी या परिपत्रकाची पोच द्यावी.

सुबोध कुमार

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य मुंबई.